# MAHARASHTRA ACT No. XVI OF 1985

## THE MAHARASHTRA ABOLITION OF SUBSISTING PROPRIETARY RIGHTS TO MINES AND MINERALS IN CERTAIN LANDS ACT, 1985

महाराष्ट्र विधानमंडळाच्या पुढील अधिनियमास राष्ट्रपती यांची संमती दिनांक १ ऑगस्ट १९८५, रोजी मिळाली असल्यामुळे तो, याद्वारे सर्व लोकांच्या माहितीसाठी प्रसिद्ध करण्यात येत आहे.

डी. एन. चौधरी,
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

# MAHARASHTRA ACT No. XVI OF 1985

## AN ACT TO ABOLISH SUBSISTING PROPRIETARY RIGHTS TO MINES AND MINERALS IN ANY LANDS UNDER THE LAND TENURE ABOLITION LAWS OR SUCH OTHER LAWS FOR THE TIME BEING IN FORCE BY ACQUISITION THEREOF AND TO PROVIDE FOR MATTERS CONECTED THEREWITH

राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक ६ ऑगस्ट १९८५ रोजी प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध केलेला]

## सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६.

**भू-धारणा निरास कायद्यांखाली किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या तशा इतर कायद्यांखाली कोणत्याही जमिनीमधील खाणी व खनिजे यांवरील विद्यमान मालकी हक्क संपादन करून नाहीसे करणे व त्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** प्रत्यक्षातील लागवडदाराला शासनाच्या थेट संपर्कात आणण्याच्या राष्ट्रीय धोरणास अनुसरून मध्यस्थांचे हक्क, जहागिरी व इनाम धारणा पद्धती नाहीशी करण्याकरिता अनेक भू-धारणा निरास कायदे तयार करण्यात आले असले तरी, त्यातून इनामदार व जहागिरदार यांचे खाणीवरील व खनिजांवरील हक्क खासकरून वगळण्यात येऊन त्यायोगे असे विद्यमान हक्क विशेषत: जेथे इनामे मृदेच्या स्वरूपात होती तेथे ते अस्तित्वात राहू देण्यात आले होते;

**आणि ज्याअर्थी,** असे इनामदार, राज्य शासनाला कोणतेही स्वामित्वधन द्यावे न लागता आणि लोकहिताला अत्यंत हानिकारक व बाधक रीतीने या इनाम जमिनीमधील खाणी व खनिजे यांचे प्रमाणाबाहेर उपयोजन करीत आहेत ;

**आणि ज्याअर्थी,** काही थोड्या इनामदारांना आपल्या व्यक्तिगत फायद्यासाठी खाणी व खनिजे यांचे असे प्रमाणाबाहेर उपयोजन करावयास प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने, तसेच राज्य शासनाचे स्वामित्वधन बुडून होणारे मोठे नुकसान थांबवण्यासाठी, समाजाच्या भौतिक साधनसंपत्तीच्या मालकीचे व नियंत्रणाधिकाराचे वितरण सामाजिक हित उत्तम प्रकारे साधले जाईल अशा रीतीने होणे आणि आर्थिक यंत्रणेच्या राबवणुकीमुळे, सामाजिक हिताला बाधक अशा रीतीने संपत्ती व उत्पादन साधने केंद्रित होण्यात पर्यवसान न होणे अगत्याचे आहे ;

**आणि ज्याअर्थी,** पूर्वोक्त प्रयोजनांसाठी 'भू-धारणा निरास कायद्यांखालील' किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर अशा कोणत्याही कायद्यांखालील कोणत्याही जमिनीतील खाणी व खनिजे यांवरील विद्यमान मालकी हक्क संपादन करून ते नाहीसे करणे व त्याशी संबंधित बाबींची तरतूद करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या छत्तिसाव्या वर्षी याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.** १. (१) या अधिनियमास, 'महाराष्ट्र विवक्षित भूमि अधिनियमांतील विद्यमान खाण व खनिज मालकी हक्क नाहीसे करण्याबाबत अधिनियम, १९८५' असे म्हणता येईल.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

**घोषणा.** २. याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, हा अधिनियम भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३९, खंड (ख) आणि (ग) मध्ये विनिर्दिष्ट केलेली तत्त्वे साध्य करण्याच्या राज्याच्या धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि त्याकरिता, कलम ४ मध्ये निर्दिष्ट अशा खाणी व खनिजांच्या विद्यमान मालकी हक्कांचे संपादन करण्यासाठी आहे.

**व्याख्या.** ३. या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(अ) "अन्यसंक्रामिती" म्हणजे 'भू-धारणा निरास कायद्यांमध्ये' किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या अशा इतर कायद्यांमध्ये व्याख्या केल्याप्रमाणे इनामदार, जहागीरदार किंवा इस्टेट-धारक, किंवा कोणताही समझोता, कौल, अनुदानपत्र, सनद किंवा आदेश अथवा न्यायालयाचा किंवा न्यायाधिकरणाचा न्यायनिर्णय, आदेश किंवा हुकूमनामा किंवा त्यावेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा विलेख याअन्वये कोणत्याही जमिनीतील कोणत्याही अंतर्मृदेमध्ये कोणताही विद्यमान हक्क धारण करणारी व्यक्ती होय, परंतु या संज्ञेत, या अधिनियमाच्या प्रारंभदिनांकास कोणत्याही खाणी किंवा खनिजे याबाबत पट्टाविषयक हक्क धारण करणाऱ्या विधिसंमत पट्टाकाराचा समावेश होणार नाही ;

(ब) "अधिनियम" म्हणजे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६'; १९६६ चा महाराष्ट्र ४१.

(क) "सक्षम प्राधिकारी" म्हणजे जिल्हाधिकारी होय आणि त्यामध्ये जिल्हाधिकाऱ्यांकडून सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिकार व कामे ज्यांच्याकडे सोपविण्यात येतील अशा, उपजिल्हाधिकाऱ्यांच्या दर्जाहून कमी नसणाऱ्या कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो ;

(ड) "भू-धारणा निरास कायदे" म्हणजे 'सारष्टी इस्टेट (जमीन महसूलाची सूट रद्द करणे) अधिनियम, १९५१' 'मुंबई जातइनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२,' 'मुंबई विलीन क्षेत्रे व प्रदेश (जहागिऱ्या नाहीशा करण्यासंबंधी) अधिनियम, १९५३,' 'मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५' आणि 'मुंबई शहर (इनामी व विशेष भू-धारणापद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९६९' हे होत ; १९५१ चा मुंबई ४७. १९५३ चा मुंबई ४२. १९५४ चा मुंबई ३९. १९५५ चा मुंबई २२. १९६९ चा महाराष्ट्र ४४.

४३१०

(ई) "विहित" म्हणजे या अधिनियमाखालील नियमांद्वारे विहित केलेले;

(फ) "अंतर्मूदा हक्क" म्हणजे कोणत्याही जमिनीच्या पृष्ठभागावर किंवा आतल्या थरावर सापडलेली किंवा सापडण्याची शक्यता असलेली खाणी व खनिजे यांवरील कोणतेही हक्क;

(ग) या अधिनियमामध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना जमीन महसूल अधिनियमामध्ये नेमून दिलेले अर्थ असतील.

**राज्यातील खाणी व खनिजे यांच्या अन्यसंक्रामितींचे हक्क निहित करणे व त्याचे परिणाम.**

४. या अधिनियमात उपबंधित करण्यात आले असेल ते खेरीजकरून अन्यथा, कोणताही समझोता, कौल, अनुदानपत्र, सनद अथवा आदेश, एखाद्या न्यायालयाचा किंवा अधिकरणाचा कोणताही न्यायनिर्णय, आदेश अथवा हुकूमनामा अथवा हा अधिनियम अंमलात येण्याच्या तारखेला, त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही कायदा किंवा लेख यात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही जमिनीच्या कोणत्याही अन्यसंक्रामितींकडे निहित असलेले खाणी व खनिजे यांचे विद्यमान हक्क कोणत्याही भाराशिवाय अशा व्यक्तींकडून राज्य शासनाकडे जातील व त्याच्याकडे निहित होतील :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला अन्यसंक्रामितीकडून किंवा शासनाकडून अंतर्मूदा हक्क भाडेपट्ट्याने धारण करणाऱ्या कोणत्याही पट्टेदाराच्या हक्कांना या कलमामुळे बाध येणार नाही; फक्त उक्त तारखेला व त्या तारखेपासून अन्यसंक्रामितीकडून भाडेपट्ट्याने पट्टा धारण करणारा पट्टेदार असेल तर तो शासनाचा पट्टेदार असल्याचे समजण्यात येईल आणि अन्यसंक्रामितीच्या प्रत असलेली सर्व बंधने शासनाकडे हस्तांतरित झाली असल्याचे समजण्यात येईल.

**खाणी व खनिजे यांचे हक्क संपादन करण्याकरिता रक्कम देणे.**

५. (१) ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी कोणत्याही जमिनीच्या संबंधात कोणताही विद्यमान अंतर्मूदा हक्क धारण करणारा कोणताही अन्यसंक्रामिती हा, या कलमाच्या पुढील तरतुदींच्या अधीनतेने,—

(अ) जीमध्ये खाण आहे किंवा खनिजे आहेत परंतु ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्वी तीन वर्षांच्या कालावधीत ज्या खाणीचे काम चालू नाही अशा जमिनीसाठी निश्चित करण्यात आलेल्या निर्धारण रकमेच्या तीनपटीइतकी रक्कम मिळण्यास पात्र असेल;

(ब) ह्या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेच्या लगतपूर्व तीन वर्षांच्या कालावधीत कोणत्याही वेळी कोणत्याही खाणीचे काम चालविण्यात आले असेल त्या बाबतीत, या जमिनीच्या बाबतीत निश्चित करण्यात आलेल्या निर्धारण रकमेच्या वीसपट इतकी रक्कम मिळण्यास पात्र असेल;

(२) पोट-कलम (१) अन्वये रक्कम मिळण्यास पात्र असलेल्या प्रत्येक अन्यसंक्रामितीला या कलमाखाली त्याला प्रदेय असलेली रक्कम निश्चित करण्यासाठी, ३१ डिसेंबर १९८५ रोजी किंवा यापूर्वी अथवा सक्षम प्राधिकाऱ्याने निश्चित केली असेल (असल्यास) अशा कोणत्याही वाढवून दिलेल्या तारखेला सक्षम प्राधिकाऱ्याकडे लेखी अर्ज करावा लागेल.

**प्रदान करावयाची रक्कम निश्चित करण्याची कार्यपद्धती.**

६. (१) कलम ५ अन्वये प्रदेय असलेली रक्कम निश्चित करण्याबाबत अर्ज मिळाल्यावर, सक्षम प्राधिकारी, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी करील. मागणीकाराला सुनावणीची आणि त्याचा दावा सिद्ध करण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, पुढील मुद्यांबाबत आपले निष्कर्ष नोंदवून सक्षम प्राधिकारी मागणीकाराला प्रदेय असलेली रक्कम निश्चित केल्याबद्दलचा निवाडा देईल :—

(अ) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील तरतुदी काहीही असल्या तरी, मागणीकार अन्यसंक्रामितीने कोणत्याही जमिनीतील खाणी व खनिजे यांसंबंधातील कोणतेही हक्क त्याला उपार्जित झाले असल्याचे व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेला ते अस्तित्वात असल्याचे त्याने सिद्ध केले आहे किंवा कसे ;

(ब) ज्या जमिनीत खाण आहे व त्या खाणीत कोणती खनिजे आढळून येतात त्या जमिनीचे क्षेत्र ;

(क) ज्या जमिनीत चालू खाण आहे व त्या खाणीत कोणती खनिजे आढळून येतात त्या जमिनीचे क्षेत्र;

(ड) या अधिनियमातील तरतुदींनुसार प्रदेय असेल अशी कोणतीही रक्कम;

(ई) जमिनीत वाटेकरी असेल त्या बाबतीत मागणीकार व वाटेकरी यांच्यामध्ये ही रक्कम कशी वाटता येईल.

(२) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी,—

(अ) कोणतीही सनद, इत्यादीमुळे कोणत्याही जमिनीसंबंधातील अंतर्मृदा हक्क हे मागणीकाराला उपार्जित झाले होते आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरी, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी हे हक्क अस्तित्वात राहणे चालू होते; आणि

(ब) कोणत्याही जमिनीत किंवा तिच्या भागात कोणत्याही खाणी किंवा खनिजे असल्याचे आढळून आले आहे किंवा त्यांच्यासंबंधात काम चालू आहे ;

ही गोष्ट सक्षम प्राधिकाऱ्यापुढे सिद्ध करण्याची जबाबदारी मागणीकारावर असेल.

**सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्ध अपील.** ७. सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याविरुद्धचे अपील, 'महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६' यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्याच्या प्रकरण पंधराअन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे दाखल करण्यात येईल. (१९६६ चा महाराष्ट्र ४१.)

**महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणापुढील कार्यपद्धती.** ८. (१) 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण' हे अपीलकार आणि राज्य शासन यांना नोटीस दिल्यानंतर अपीलावर निर्णय देईल आणि आपला निर्णय नोंदवील.

(२) या अधिनियमाखाली अपीलावर निर्णय देताना 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरण' हे, न्यायालयाला 'दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८' अन्वये मूळ न्यायालयाच्या हुकूमनाम्याविरुद्ध किंवा आदेशाविरुद्ध आलेल्या अपीलाचा निर्णय देताना ज्या अधिकारांचा वापर करता येतो त्या अधिकारांचा वापर करील आणि न्यायालय जी कार्यपद्धती अनुसरते ती कार्यपद्धती अनुसरील. (१९०८ चा ५.)

**मुदत.** ९. या अधिनियमाखाली 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे' केलेले प्रत्येक अपील, सक्षम प्राधिकाऱ्याच्या निवाड्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या मुदतीत करण्यात येईल. असे अपील दाखल करण्याबाबत 'मुदत अधिनियम, १९६३' याच्या कलमे ४, ५, १२ आणि १४ च्या तरतुदी लागू होतील. (१९६३ चा ३६.)

**न्यायालय शुल्क.** १०. 'मुंबई न्यायालय शुल्क अधिनियम, १९५९' यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या अधिनियमाखाली 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे' करण्यात येणाऱ्या प्रत्येक अपीलावर, विहित अशा मूल्याचा न्यायालय शुल्क मुद्रांक असेल. (१९५९ चा मुंबई ३६.)

**निवाडा आणि महसूल न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असणे.** ११. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला निवाडा 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाकडे' करावयाच्या अपीलाच्या अधीनतेने आणि 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणाने' त्या अपीलावर दिलेला निर्णय अंतिम व निर्णायक असेल आणि त्यावर, कोणत्याही न्यायालयामध्ये कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत आक्षेप घेण्यात येणार नाही.

**चौकशी व कार्यवाही हे न्यायिक कामकाज असणे.** १२. या अधिनियमान्वये सक्षम प्राधिकाऱ्यापुढे आणि 'महाराष्ट्र महसूल न्यायाधिकरणा' पुढे चालणारी चौकशीची व इतर सर्व कार्यवाही 'भारतीय दंड संहिते' च्या कलमे १९३, २१९ आणि २२८ यांच्या अर्थानुसार न्यायिक कामकाज असल्याचे मानण्यात येईल. (१८६० चा ४५.)

९३

१३. (१) राज्य शासनास, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमातील तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनाकरिता नियम करता येतील, त्यांमध्ये या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता फी बसवण्याच्या तरतुदींचाही समावेश असेल. नियम करण्याचा अधिकार.

(२) या नियमांनुसार केलेले सर्व नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) ह्या कलमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन अधिवेशनात, एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास जर दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे कबूल होतील व असा निर्णय शासकीय राजपत्रात अधिसूचित करतील तर, अशा अधिसूचनेच्या तारखेपासून प्रकरणपरत्वे अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच नियम अंमलात येतील किंवा मुळीच अंमलात येणार नाहीत. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९६६ चा महाराष्ट्र ४१.

१४. 'महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६.' याच्या कलम ४८, पोट-कलम (१) मधील— सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम ४१ याच्या कलम ४८ ची सुधारणा.

(अ) "राज्य शासनाने दिलेल्या अनुदानाच्या शर्तीत अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली नसेल तर" हा प्रारंभीचा मजकूर वगळण्यात येईल आणि चौथ्या ओळीतील "जमिनीवर किंवा जमिनीखाली असलेल्या" हा मजकूर प्रारंभी दाखल करण्यात येईल.

(ब) परंतुक वगळण्यात येईल.

१९५३ चा मुंबई ४२. १९५४ चा मुंबई ३९. १९५५ चा मुंबई २२. १९६९ चा महाराष्ट्र ४४.

१५. हा अधिनियम अंमलात आल्याच्या तारखेस व त्या तारखेपासून, 'मुंबई जातइनामे नाहीशी करण्याबाबत अधिनियम, १९५२' याचे कलम ९, 'मुंबई विलीन क्षेत्रे व प्रदेश (जहागिरी नाहीशी करण्यासंबंधी) अधिनियम, १९५३' याचे कलम १०, 'मुंबई विलीन प्रदेश किरकोळ दुमाला वहिवाटी नाहीशा करण्याबाबत अधिनियम, १९५५' याचे कलम १३ आणि 'मुंबई शहर (इनामी व विशेष भू-धारणापद्धती) नाहीशा करण्याबाबत आणि महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम (सुधारणा) अधिनियम, १९६९' याचे कलम ९ आणि त्यावेळी अंमलात असलेल्या अशा कोणत्याही कायद्यातील तत्सम तरतुदी निरसित होतील. निरसन व व्यावृत्ति.

१६. या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना काही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासन ती अडचण दूर करण्यासाठी प्रसंगपरत्वे त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, परंतु अशा तरतुदींशी विसंगत नसेल अशी कोणतीही गोष्ट आदेशाद्वारे करू शकेल : अडचण दूर करण्यासंबंधीचा अधिकार.

परंतु, असा आदेश, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर काढण्यात येणार नाही.

(यथार्थ अनुवाद)

न. ब. पाटील,
भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई